Publication: Vritta manas
Date: 12/3/2020
Page: 8
Column: 2-4

मुंबई
वृत्तमानस
गुरुवार, १२ मार्च २०२०

# अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने राखली राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहाची परंपरा

मुंबई

अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने ४ मार्च रोजी राष्ट्रीय सुरक्षितता दिवस साजरा केला आणि आपल्या वितरण क्षेत्रातील ग्राहकांना विद्युत सुरक्षितता उपायांबाबत शिक्षण देण्यासाठी आठवडाभराच्या शिक्षण मोहिमेचे आयोजन केले. राष्ट्रीय सुरक्षितता परिषदेने सुरू केलेल्या या चळवळीने यंदा आपला ४९वा स्थापनादिन साजरा केला. यासाठी “एन्हान्स हेल्थ अँड सेफ्टी परफॉर्मन्स बाय यूज ऑफ अॅडव्हान्स्ड टेक्नोलॉजी” हा विषय घेण्यात आला होता. एईएमएलने ४ मार्च ते ११ मार्च २०२० दरम्यान राष्ट्रीय सुरक्षितता सप्ताहाचे औचित्य साधून मानवी आयुष्याच्या संरक्षणात निर्णायक महत्त्वाच्या प्रतिबंधात्मक उपायांबाबत सर्व वयोगटांतील नागरिकांना माहिती दिली.



फोटो मथळा एईएमएलच्या सेफ्टी टीमने ४९व्या नॅशनल सेफ्टी वीक २०२० कार्यक्रमादरम्यान बैल बाजार, कुर्ला येथे राहणा-या आपल्या ग्राहकांसाठी त्यांच्या घरी व शेजारी वीजेच्या बाबतीत घेण्यात येणा-या सावधगिरीच्या उपायांबाबत एक शैक्षणिक जागरुकता सत्र आयोजित केले.